असा. क्र. ४९ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, आक्टोबर ५, २००६/आश्विन १३, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश . . . . ३४३-३४५

### नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ ऑक्टोबर २००६

**MAHARASHTRA ORDINANCE No. X OF 2006.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६५ चा महा. ४०.



[**किंमत :** रुपये ९.००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१-१अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा उल्लेख " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५१-१अ मधील पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

" (३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (अध्यक्ष निवडणूक) नियम, १९८१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २००६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास अंमलात असलेल्या अध्यक्ष पदांच्या आरक्षणाशी संबंधित बिंदू नामावलीमध्ये कलम ५२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अध्यक्ष पदाच्या मुदतीच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी सुधारणा केली असल्याचे मानण्यात येईल.". २००६ चा महा. अध्या. १०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५१अ मध्ये,—

(क) पोट-कलम (६) मधील " एक वर्षाच्या " या मजकुराऐवजी " अडीच वर्षांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (७) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (७) उपाध्यक्षाचे पद, कोणत्याही कारणामुळे रिक्त झाले असेल तर, पोट-कलमे (१) ते (३) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरून ते रिक्त पद भरण्यात येईल आणि अशा रीतीने निवडून आलेला उपाध्यक्ष, असे पद रिक्त झाले नसते तर ज्या मुदतीसाठी त्याचा पूर्वाधिकारी त्या पदावर राहिला असता त्या मुदतीच्या उर्वरित कालावधीसाठीच त्या पदावर राहील. ".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५२ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

अध्यक्ष पदाची मुदत.

" **५२.** अध्यक्षपदाची मुदत अडीच वर्षे इतकी असेल :

परंतु, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २००६ अंमलात येण्याच्या दिनांकास जे अध्यक्षपद धारण करत असतील त्या अध्यक्षांना या कलमातील काहीही लागू असणार नाही आणि त्यांची मुदत ही, त्यांच्या संबंधित परिषदांच्या मुदतीएवढीच असेल. ". २००६ चा महा. अध्या. १०.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये,—

(एक) पोट-कलम (१) मधील परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :—

" परंतु, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत असा कोणताही ठराव मांडता येणार नाही. ";

(दोन) पोट-कलम (६) मधील " अशा विशेष बैठकीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीमध्ये " हा मजकूर वगळण्यात येईल.

## निवेदन

महानगरपालिकांचे महापौर आणि जिल्हा परिषदांचे अध्यक्ष यांचा पदावधी हा, त्यांच्या निवडणुकीच्या दिनांकापासून अडीच वर्षे इतका आहे. तथापि, नगरपरिषदांच्या अध्यक्षांचा व उपाध्यक्षांचा पदावधी, अनुक्रमे पाच वर्षे व एक वर्ष इतका आहे.

२. नगरपरिषदांचे अध्यक्ष, महानगरपालिकांचे महापौर आणि जिल्हा परिषदांचे अध्यक्ष यांच्या पदावधीमध्ये एकरूपता आणण्यासाठी, नगरपरिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधीदेखील अडीच वर्षे इतका असेल अशी तरतूद करणे इष्ट वाटते.

३. अध्यक्षाच्या पदाला स्थैर्य आणण्यासाठी, अध्यक्षाच्या निवडणुकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत, अविश्वास ठराव आणता येणार नाही आणि अध्यक्षाला पदावरून दूर करण्यासाठी ठराव मांडला गेला नाही किंवा या प्रयोजनाकरिता, बोलावलेल्या विशेष सभेमध्ये तो फेटाळण्यात आला तर परिषदेपुढे कोणताही नवीन ठराव आणता येणार नाही, अशी तरतूद करणे इष्ट वाटते.

४. अध्यक्षाचा पदावधी अडीच वर्षे इतका करण्याची तरतूद अंमलात आणण्यासाठी, अध्यक्षाच्या पदासाठीच्या आरक्षणासंबंधातील विद्यमान बिंदू नामावलीमध्ये, सुधारणा केली असल्याचे मानण्यात येईल, अशी तरतुददेखील करणे इष्ट वाटते.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यात आणखी सुधारणा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ४ ऑक्टोबर २००६.

**एस. एम. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. ज. मो. फाटक,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई